**नि.फौ.ख.क्र. ४८/२०१६**
सरकार – वि.- राजु पवार
**निशाणी क्र. १९**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ -**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – तन्वीर रशीद शेख- पंच
वय – ३७ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
सध्या रा. - ताडीवाला रोड, पुणे.

**फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए. एस. काळे यांचे मार्फत सुरु-**

दि. २६/०४/२०१६ रोजी मला पंचनाम्याकामी लोहमार्ग पोलीस स्टेशन, पुणे येथे पाटोळे साहेबांनी बोलवले होते. मी तेथे गेलो तेव्हा एक इसम त्यांचे ताब्यात होता. रेसुबचे कर्मचारी देखील तेथे होते. पोलीसांनी माझे समक्ष आरोपीची अंगझडती घेतली व त्याच्या ताब्यातुन ३२ से.मी चा रामपुरी चाकु व १००/- रुपये चलनाच्या २ नोटा माझे समक्ष जप्त करुन पंचनामा तयार केला. आरोपीने चौकशीमध्ये त्याचे नाव राजु पवार असे सांगितले होते. पंचनामा पाहिल्यास मी ओळखु शकतो. आता मला जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी, दुसरे पंच अशोक पायाळ व पोलीस पाटोळे यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २०** देण्यात येतो.

२. त्यानंतर पोलीसांनी माझे समक्ष सदरच्या इसमास अटक करुन पंचनामा तयार केला. त्याची अटक घरच्यांना कळवली होती. आता मला अटक पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी, दुसरे पंच अशोक पायाळ व पोलीस पाटोळे यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २१** देण्यात येतो. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. आरोपी आज रोजी गैरहजर आहे.

**सरतपास पुर्ण .**

**आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.05.11 16:34:39 +0530

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

दि. ११/०५/२०२६
स्थळ - पुणे

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.